महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर, ता. १५ (प्रतिनिधी) -

..............................

शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्यावतीने ता. २५ फेब्रुवारी ते ४ मार्च या कालावधीत मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही मोडी लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊच शकत नाही तसेच या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरीताही ही लिपी ज्ञात असणे परिहार्य आहे. ही काळाची गरज लक्षात घेऊन सदरच्या प्रशिक्षण कार्यशाळेत मच्छिंद्र चौधरी, डॉ. नीलांबरी जगताप सदर कार्यशाळेसाठी शैक्षणिक पात्रता पदवी व प्रवेश विनामूल्य आहे. विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमी यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केंद्राच्या समन्वयक, डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

महासत्ता

# संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

कोल्हापूर, ता. १५ (प्रतिनिधी) -

शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, डॉ. प्रल्हाद माने, कायदे सल्लागार अनुष्का कदम आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठाचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय बुद्धिबळ स्पर्धा दि. १४ ते १६ फेब्रुवारीदरम्यान भोपाळ (मध्य प्रदेश) येथे पार पडल्या. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर महिला संघाने २२.५ गुणांनी द्वितीय क्रमांक मिळवला. विद्यापीठाच्या संघामध्ये तृप्ती प्रभू, मयूरी सावळकर, गायत्री राजपूत, ईशा कोळी, अनुष्का पाटील व वैष्णवी पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तृप्ती प्रभू हिने ५ व्या बोर्डसाठी सुवर्णपदक मिळवले. विजयी संघाची ऑल इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक म्हणून डॉ. सविता भोसले यांनी मार्गदर्शन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे, डॉ. एस. व्ही. बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ कयाकिंग स्पर्धेत निकिताला दोन पदके

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय कयाकिंग (नौकानयन) स्पर्धेत निकिता तानाजी पिष्टेने शानदार कामगिरी केली. इचलकरंजीतील पंचगंगा नदी घाटावर झालेल्या या स्पर्धेत निकिताने के-वन या गटातील २०० मीटर आंतराच्या शर्यतीत सूवर्ण पदक पटकावले. सुवर्ण पदकाला गवसणी घालण्यासाठी तीने ६ महाविद्यालयांच्या स्पर्धकांना मागे टाकले. तसेच के-वन या गटात झालेल्या ५०० मीटर आंतराच्या शर्यतीतही तीने रौप्य पदक मिळवले. इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्ट, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत मिळवलेल्या दोन पदकांमुळे निकिताची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड करण्यात आली आहे. निकिता ही आजरा महाविद्यालयाची विद्यार्थींनी असून तिला प्राचार्य डॉ. अशोक सादळे, उपप्राचार्य दिलीप संकपाळ व शारीरिक शिक्षण संचालक धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

तरुण भारत



# आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी कोमल पोवार, नेहा रणदिवेची निवड

**सिद्धनेर्ली :** शिवाजी विद्यापीठांतर्गत यशवंतराव चव्हाण कॉलेज, सातारा येथे झालेल्या तायक्वांदो स्पर्धेमध्ये सिद्धनेर्लीच्या कोमल रवींद्र पोवारने सुवर्णपदक पटकाविले तर नेहा विलास रणदिवेने रौप्यपदक पटकाविले. हरियाणा (कुरुक्षेत्र) येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी (ऑल इंडिया) शिवाजी विद्यापीठ संघामध्ये त्यांची निवड झाली. त्यांना प्रशिक्षक उमाजी पोवार यांचे मार्गदर्शन लाभले. निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.